15-03-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

VTG/ 13:00

15-03-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A 1

VTG/ KGS/ MHM/ 13.00

सभापती स्थानी : माननीय सभापती

सभापती : आता नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी घेण्यात येईल.

<u>दिवसाचे कामकाज स्थगित करण्याबाबत</u>

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आम्ही नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला असून प्रश्नोत्तराच्या तासासह आजच्या दिवसाचे सगळे कामकाज स्थगित करण्यात यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री.आर.आर.पाटील :सभापती महोदय, प्रथम शपथविधी घेण्यात यावा.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, शपथविधीसह सगळे कामकाज स्थगित करण्यात यावे.

सभापती : नव्याने निवडून आलेल्या सदस्यांचा शपथविधी हा मॅन्डेटरी आहे.

एक सन्माननीय सदस्य (बसून) : शपथविधी हा कामकाजाचा भाग नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय,सभागृहाचे कामकाज स्थगित करुन नियम 289 अन्वये आम्ही जो प्रस्ताव दिलेला आहे त्यावर ताबडतोबीने चर्चा घेण्यात यावी अशी माझी आपल्याला विनंती आहे. दिवसाच्या सर्व कामकाजामध्ये शपथविधी सुध्दा आला आहे. अशा वातावरणामध्ये शपथविधीचा कार्यक्रम घेणे योग्य होणार नाही. सन्माननीय सदस्य निवडून आलेले आहेत त्यांचे मी अभिनंदन करतो व स्वागत करतो. ते निवडून आल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. परंतु आम्ही एका स्पिरीटने हा प्रस्ताव दिलेला आहे.सदस्यांच्या शपथविधीला आमचा विरोध नाही.परंतु आज दिनांक 15 मार्च 2005 रोजी महाराष्ट्र विधानपरिषद नियम 289 अन्वये सभागृहापुढचे सर्व कामकाज बाजूला ठेवून खालील विषयावर चर्चा करण्यात यावी अशी मी नोटीस दिलेली आहे. मला सांगतांना अतिशय वाईट वाटते की, कापूस उत्पादक शेतक-यांचे 3600 कोटी रुपये ...

सभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपले म्हणणे मांडण्याचे थांबवावे. माननीय उपमुख्यमंत्र्यांना या बाबतीत काय म्हणावयाचे आहे ?

श्री.आर.आर.पाटील :सभपती महोदय, आता शपथविधीचा कार्यक्रम घेण्यात यावा.

. (एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-03-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A 2
VTG/ KGS/ MHM/ 13.00

सभापती : विरोधी पक्षाच्या नेत्यांना ज्याप्रमाणे बोलण्याचा हक्क आणि अधिकार आहे त्याप्रमाणे शासनाची भूमिका मांडण्याचा माननीय उपमुख्यमंत्र्यांना हक्क आणि अधिकार आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, शपथविधी हा कामकाजाचा एक भाग आहे. तेव्हा शपथविधीसुध्दा आता घेण्यात येऊ नये. कापसाचा प्रश्न हा अत्यंत महत्वाचा आहे. अनेक शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज दररोज प्रश्नोत्तराच्या तासापासून सुरु होत असते.कधी तरी होणारा शपथविधी हा सभागृहाच्या कामकाजाचा भाग नाही.सन्माननीय सदस्य हे निवडून आलेले असल्यामुळे त्यांना सभागृहाच्या कामकाजात सहभागी होण्यापासून मज्जाव करु नये . आपण लोकशाहीचा सन्मान केला पाहिजे.

श्री.नितीन गडकरी : सभागृहापुढील सर्व कामकाजामध्ये शपथविधीचा हा एक आयटेम आहे. आम्ही आपल्याकडे सभागृहाचे सर्व कामकाज स्थगित करावे यासाठी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. Oath taking is a part of Business.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय,सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 289 अन्वये सभागृहाचे कामकाज थांबवून बाकीचे कामकाज घेण्यात यावे अशी मागणी केलेली असली तरी या संबंधी अंतिम निर्णय आपणच घ्यावयाचा आहे.त्यांनी मागणी मांडलेली आहे .त्याबाबतीत सन्माननीय उपमुख्यमंत्री काही भूमिका मांडत आहेत. तेव्हा यावर आपण आपला निर्णय द्यावा आणि सभागृहाचे कामकाज सुरु करावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण माझे म्हणणे ऐकून घ्यावे.

सभापती : नियम 289 अन्वये प्रस्ताव मांडण्यास मी आपल्याला परवानगी दिलेली नव्हती.हा प्रस्ताव मांडण्यासाठी मी आपल्याला परवानगी दिल्यानंतर त्यावर आपण आपले विचार मांडावयाचे असतात.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण दिवसाच्या कामकाजाचा क्रम दिलेला आहे. त्यामध्ये पहिला क्रमांक हा नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी हा आहे.दुसरा मुद्दा असा आहे की, ज्या सन्माननीय सदस्यांचा शपथविधी व्हावयाचा आहे ते मंत्री असून सहा महिन्या पर्यन्त ते या सभागृहात बसू शकतात..

नंतर श्री.जागडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

त्यामुळे कामकाजात काहीच अडचण येणार नाही. आज जर शपथविधीचा मुहूर्त आहे, तर शेतक-यांना चुकारा देण्याचा मुहूर्त केव्हाचा आहे ? तो माननीय श्री. वळसे-पाटील यांनी आम्हाला सांगावा. आपण शेतक-यांच्या आत्महत्यांचे मुहूर्त ठराविले आहेत. त्याच्या बाबतीत काहीतरी बोला.

(गोंधळ)

श्री. नितीन गडकरी : विधानसभा किंवा विधानपरिषदेत कामकाज स्थगित करण्याची नोटीस ज्यावेळी विरोधी पक्षांकडून येते, तेव्हा त्या नोटीसमध्ये काय आहे किंवा काय नाही, हे सांगण्याची संधी सदस्यांना दिली जाते. ही सभागृहाची आजपर्यन्तची परंपरा आहे. आज विधानसभेमध्ये जेव्हा हा प्रस्ताव विरोधी पक्षनेत्यांकडून मांडला, तेव्हा त्याबाबतची सर्व मते मा. अध्यक्षांनी ऐकून घेतली. त्याप्रमाणे मी आपणाला विनंती केली आहे की, नियम 289 प्रमाणे आजचे सभागृहाचे सर्व कामकाज स्थगित करावे. त्यामुळे या बाबतचे माझे म्हणणे आपण ऐकून घ्यावे. परंतु असे बोलत असताना मा. सभापती महोदय, आपण मला थांबविले आणि मा. उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांना आपण सांगितले की, तुम्ही बोला. त्यांनी असे सांगितले की, शपथविधी हा आजच्या कामकाजाचा भाग नाही.

श्री. आर. आर. पाटील : (खाली बसूनच) नित्याच्या कामकाजाचा भाग नाही.

श्री. नितीन गडकरी : आता नित्य असो, अनित्य असो, पवित्र असो, अपवित्र असो. आता माननीय सभापतींनी जो अजेंडा तयार केला आहे, त्यावर क्र. 1 वर शपथविधीचा कार्यक्रम लिहिलेला आहे. शपथविधी हा कामकाजाचा भाग आहे. तेव्हा ही बाब क्लिअर आहे. मला आता या बाबत काहीच म्हणावयाचे नाही. तेव्हा आजचे सर्व कामकाज स्थगित करुन हा प्रस्ताव चर्चेला घ्यावा असे माझे म्हणणे आहे. असे असताना माननीय सभापती महोदय, आपण मला बोलू देत नाही. माझे म्हणणे आपण ऐकतही नाही. अशा परिस्थितीत आपण शपथविधीची घोषणा करणार असाल तर आम्ही कामकाज कसे करावयाचे ? मला मा. सभापती महोदय, आपणाकडून संरक्षण मिळाले पाहिजे. माझे काही प्रिव्हीलेजेस आहेत. मी आपणाकडे 289 ची नोटीस दिली आहे. आता ही नोटीस मांडण्याची संधी आपण मला सभागृहात देणार आहांत की नाही ? लोकशाहीमध्ये आपण मला ही संधी देणार नसाल तर मी काय करावयाचे ? आपणाबद्दल पूर्ण सन्मान ठेवून मी आपणाला विनंती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी.....

करीत आहे. मला नोटीस मांडण्याची संधी द्या. माझे म्हणणे मांडण्याची मला संधी द्या. त्यानंतर आपणाला जो काही निर्णय घ्यावयाचा आहे, तो आपण घ्यावा. परंतु मला आपण माझे म्हणणे मांडण्याची संधीच देत नाही.

सभापती : मा. विरोधी पक्षनेत्यांना मला हे सांगावयाचे आहे की, आपण दिलेल्या दोन नोटीस मांडण्याकरिता आपण उभे राहिला असता आणि आपल्या दोन्ही नोटीसेस मांडल्या असत्या व आपले भाष्य सुरु केले असते, तर ते बरोबर होते. परंतु तशी काही परिस्थिती झाली नाही. माननीय श्री.आर.आर. पाटील यांनी ज्यावेळी हरकतीच्या मुद्दावर बोलण्याची इच्छा व्यक्त केली, तेव्हा त्यांना बोलण्याची संधी देणे हे माझे कर्तव्य आहे.

(गोंधळ)

सभापती : श्री. आर. आर. पाटील यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता.

(गोंधळ)

सभापती : माननीय श्री. आर. आर. पाटील यांना काय सांगावयाचे आहे ?

(गोंधळ)

श्री. विनोद तावडे : आपण रेकॉर्ड तपासून पहा.

(गोंधळ)

श्री. आर. आर. पाटील : मा. विरोधी पक्षनेते बोलत असताना मी इन्टरप्ट केले होते. मी हात वरुन आपणाकडे बोलण्यास परवानगी मागितली होती. ही परवानगी म्हणजेच विरोधी पक्षनेत्यांच्या बोलण्यावर माझी हरकतच होती.

श्री. नितीन गडकरी : त्यांचा हरकतीचा मुद्दा नव्हता.

(गोंधळ)

सभापती : माननीय विरोधी पक्षनेते बोलत असताना श्री. आर. आर. पाटील यांनी इन्टरप्ट केले, म्हणून मी त्यांना बोलण्याची परवानगी दिली. आता अशा वेळी मा. विरोधी पक्षनेत्यांनी थांबले पाहिजें ना ? आता विराधी पक्षनेते थांबले याचा अर्थ त्यांचे सर्व प्रतिपादन संपले असे नाही. मा.विरोधी पक्षनेत्यांचा बोलण्याचा हक्क आहे. तो लोकशाहीमध्ये मान्यच आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : मा. सभापती महोदय, आपल्या पदाबद्दल आणि विधीमंडळाच्या नियमाबद्दल पूर्ण सन्मान ठेवून आपणाला विनंती करतो की, मी या विषयावर बोलण्यास सुरुवात केली, तेव्हा सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील हे बोलण्यास उभे राहिले. त्यावेळी ते शपथविधीसाठी सन्माननीय सदस्यांचे नांव घेण्यासाठी उभे राहिले असे मला वाटले. परंतु ते या संबंधात काहीच बोलले नाहीत. त्यांनी माझ्या बोलण्यावर हरकतीचा मुद्दा उपस्थित केला असता, तर गोष्ट वेगळी होती. परंतु त्यांनी मला त्यावेळी थांबविले. वास्तविक त्यांच्यासारख्या उपमुख्यमंत्री पदावर असलेल्या व्यक्तीने मला थांबविले. कदाचित तरुण वयात उत्साहाने तसे केले असेल. आता ते माझे मित्रच आहेत. मी त्यांच्यावर रागवत नाही. या सदनात तसे चालतच असते. परंतु त्यांनी माझे म्हणणे पूर्ण ऐकून घेतले असते तर बरे झाले असते. मी त्यांनाच विनंती करणार होतो की, या 289 च्या प्रस्ताव माननीय आर. आर. पाटील साहेब आपण जर निवेदन करणार असाल तर आम्ही सर्वजण आपले निवेदन ऐकण्यास तयार आहोत. मी त्यांना आपल्यामार्फत ही विनंती करणार होतो. आता याप्रमाणे माझी विनंती ते मान्य करणार असतील तर पुढेच कामकाज करावयाला आमची हरकत नाही. आम्ही त्यालाही सहकार्य करु. आता माननीय सभापती महोदय, आपल्याला असे वाटत असेल की, ही नोटीस स्वीकारणे योग्य नाही. तेव्हा तसा आपण निर्णय घेऊ शकता. आपण सार्वभौम आहात. परंतु याबाबत आमच्या ज्या भावना आहेत, त्या आपण दोन मिनिटे ऐकून घ्या आणि नंतर निर्णय द्या.

(यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

आम्हा सदस्यांच्या भावना आपण ऐकून न घेता आपण निर्णय दिला व आमचे बोलणे बंद झाले तर आमच्या भावना लोकांपर्यंत कशा पोहोचतील? तेव्हा माझी आपणाला विनंती आहे की, आम्हाला आमचे म्हणणे मांडू देण्याकरीता आपण संधी द्यावी.

सभापती : माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी सांगू इच्छितो की, आजच्या कामकाजाच्या पत्रिकेमधील बाब क्रमांक 1 वर "नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी" ठेवलेला आहे. तेव्हा माननीय सदस्यांचा शपथविधी पार पडल्यानंतर नियम 289 अन्वये ज्या दोन सूचना माझ्याकडे विरोधी पक्षाकडून देण्यात आल्या आहेत त्याबाबतीत माननीय विरोधी पक्ष नेते व अन्य माननीय सदस्यांना याठिकाणी म्हणणे मांडण्याकरिता मी संधी देईन व त्यानंतर आपण निर्णय घेऊ.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी आपल्याला उद्याही घेता येईल. किंवा याठिकाणी आम्ही उपस्थित करीत असलेल्या विषयाच्या संदर्भात निर्णय लागल्यावरही घेता येईल. नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी घेण्यास आमचा विरोध नाही. नियम 289 चा अर्थ असा आहे की, "सभागृहासमोरील संपूर्ण कामकाज स्थगित ठेऊन एखाद्या विषयावर चर्चा घेणे". असे नियमात स्पष्ट म्हटले असतांना आपण हे कामकाज घ्यायला परवानगी कशी देता?

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, नियम 289 मध्ये सभागृहाचे सर्व कामकाज थांबविण्याची तरतूद आहे, सभागृहाचे अर्धवट कामकाज थांबविण्याची तरतूद कोणत्याही नियमात नाही. एकदा नियमित कामकाज सुरु झाल्यानंतर ते कामकाज घेणे हा नंतरचा भाग झाला. परंतु अर्धवट कामकाज थांबविण्याची तरतूद कोणत्याही नियमात नाही म्हणून आपण हे सर्व कामकाज थांबविण्याबाबत निर्णय द्यावा.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपल्याला नियम 289 मधील तरतूद वाचून दाखवितो. "कोणत्याही सदस्यांस सभापतींच्या संमतीने कोणताही नियम विधानपरिषदेपुढील कोणत्याही विशिष्ट प्रस्तावास तो लागू करतांना स्थगित करण्यात यावा असा प्रस्ताव मांडता येईल आणि प्रस्ताव संमत झाला तर, संबंधित नियम त्या वेळेपुरता स्थगित होईल". याठिकाणी बाब क्र. 1 वर "नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी" हा सुध्दा सभागृहाच्या कामकाजाचा भाग आहे. त्यामुळे नियम 289 प्रमाणे ही बाब स्थगित ठेऊन आम्ही दिलेल्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी आपण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

आम्हाला संधी द्या अशी मी आपणास विनंती केली आहे. तेव्हा सभागृहाच्या कामकाजातील पहिली बाब घ्यायची आणि नंतरच्या बाबी घ्यायच्या नाहीत असे कसे करता येईल?

सभापती : याठिकाणी माझ्याकडे दोन प्रस्ताव देण्यात आले आहेत. त्यामध्ये एक प्रस्ताव माननीय विरोधी पक्षनेते श्री. नितीन गडकरी व इतर यांचा आहे. त्यामध्ये सर्वश्री मधुकर सरपोतदार, पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, दिवाकर रावते, अशोक मोडक, अरविंद सावंत, विनोद तावडे यांची नावे असून "राज्यसरकारने कापसाला 2700 रुपये भाव देण्याची केलेली व राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जावरील व्याज माफ करण्याची केलेली घोषणा, व सदर प्रकरणी शासनाने घेतलेली माघार" अशाप्रकारची ही मोशन दिलेली आहे. यामध्ये पहिल्या बाबीचा यत्किंचितही उल्लेख नाही. म्हणून माझे असे मत आहे की,....

श्री. नितीन गडकरी : सर्व कामकाज याचा अर्थ काय? Whether "Oath taking" is included in the business or not? दिनांक 15 मार्च 2005 रोजी महाराष्ट्र विधानपरिषद नियम 289 अन्वये सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला ठेऊन खालील विषयावर चर्चा करण्यात यावी असा प्रस्ताव आम्ही दिलेला आहे. तेव्हा सभागृहाचे सर्व कामकाज म्हणजे दिवसाच्या कामकाजाच्या क्रमातील बाब क्र. एक पासून पुढे जेवढया बाबी असतील ते सर्व कामकाज. आणि म्हणून हे संपूर्ण सभागृहाचे कामकाज थांबवून खालील विषयावर चर्चा घेण्यात यावी अशाप्रकारचा प्रस्ताव आम्ही दिलेला आहे. याठिकाणी बाब क्र. 1 वर "नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी" आणि बाब क्र. 2 वर "प्रश्नोत्तरे" आहे. म्हणून मी आपणास विनंती केली आहे की, हे सर्व कामकाज आपण स्थगित करावे. परंतु आपण बाब क्र. 1 वरील "नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी" घेऊ पहात आहात. माझी आपल्याला विनंती आहे की, आम्हाला या प्रस्तावावर बोलू द्या, आमचे म्हणणे आपण ऐकून घ्या. कदाचित माननीय उप मुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील हे आमचे म्हणणे मान्य करीत असतील तर तो विषय संपेल, आणि जर ते मान्य करीत नसतील तर आमचे म्हणणे रिजेक्ट करण्याचा आपल्याला अधिकार आहे. आपल्याला हे कामकाज कसे रेटायचे ते रेटू शकता, आम्हाला जे करायचे आहे ते आम्ही करु...

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय विरोधी पक्षनेते याठिकाणी जो काही प्रस्ताव मांडणार आहेत तो प्रस्ताव जर मतदानाला टाकण्यात आला तर

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार...

आमच्या बाजूकडील एका माननीय सदस्यांना त्यावर मतदान करता येणार नाही. म्हणून अगोदर त्या माननीय सदस्यांचा शपथविधी याठिकाणी व्हायलाच पाहिजे. यावर आपण निर्णय द्यावा.

सभापती : माननीय सदस्यांचा हरकतीचा मुद्दा बरोबर आहे. नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी होणे आवश्यक आहे, त्यादृष्टीने योग्य निर्णय घेण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : माननीय सदस्य डॉ. वसंत पवार आपण शेतकऱ्यांची अशी थट्टा करु नका...

सभापती : नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधीच्या अधिकाराचा योग्य गौरव करणे आपले कर्तव्य आहे. त्यांची संधी डावलली जाणार नाही यादृष्टीने योग्य ती व्यवस्था करण्यात येईल. त्याबाबत आपण काळजी करु नका. आता माननीय विरोधी पक्षनेते आपण आपले म्हणणे मांडा...

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

श्री.नितीन गडकरी (मा.विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आज आपल्याकडे नियम क्र.289 अन्वये सभागृहाच्या कामकाज पत्रिकेवरील अनु. क्र.1 ते अनु.क्र.14 पर्यंतचे सर्व कामकाज स्थगित करुन एका महत्वाच्या विषयावर माननीय सभागृहाचे नेते श्री.आर.आर.पाटीलसाहेब आणि या शासनाचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्यांनी या सभागृहासमोरील सर्व कामकाज स्थगित करुन ताबडतोब या विषयावरील चर्चेसाठी अनुमती द्यावी अशी त्यांना नम्रतापूर्वक विनंती करतो.

माननीय सभापती महोदय, आज महाराष्ट्रातील शेतक-यांची अवस्था अतिशय वाईट आहे. माझ्या अंदाजाप्रमाणे 550 पेक्षा जास्त शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. माझ्याकडे त्यांची नावे आहेत. आपण पाहिले, की या आत्महत्या कुठे झाल्या आहेत ? तर असे दिसेल की, या आत्महत्या देशामध्ये आंध्र प्रदेशातील जो कॉटन ग्रेड एरिया आहे, कापूस उत्पादक प्रदेश आहे आणि विदर्भ, मराठवाडा येथील जो कापूस उत्पादक भाग आहे त्या भागामध्ये या आत्महत्या झालेल्या आहेत. कापसाच्या बाबतीत अशी स्थिती होती की, महाराष्ट्रात निवडणुका होण्यापूर्वी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांनी आपला जो जाहीरनामा प्रसिध्द केला होता, त्यामध्ये त्यांनी महाराष्ट्राच्या जनतेला असे वचन दिले आहे की, आम्ही कापसाला 2700 रुपये क्विं. भाव देऊ. असे जाहीर केल्यानंतर स्वाभाविकपणे आपल्याला सरकारकडून तो भाव मिळेल या आशेवर त्यांनी या सरकारला मतदान केले. जे कापूस उत्पादक शेतकरी आहेत, त्यांच्याकडे विजेच्या पंपाचे कनेक्शन आहेत आणि त्यांच्याकडे बरीच थकीत बाकी आहे. त्यांच्याकडे जिल्हा सहकारी बँकांचे, सेवा सहकारी सोसायटीचे,भूविकास बँकेचे, राष्ट्रीयकृत बँकेचे कर्ज आहे आणि ते कर्ज शेतकरी फेडू शकत नाहीत. म्हणून डिसेंबरमध्ये नागपूर येथील अधिवेशनामध्ये आम्ही सभागृहामध्ये मागणी केली होती की,शेतकरी आत्महत्या करीत आहेत. म्हणून आत्महत्या करणा-या शेतक-यांच्या कुटुंबियांना युतीच्या शासनाने जशी एक लाख रुपयांची मदत केली होती. तशाच प्रकारची मदत या सरकारने देखील करावी. तेव्हा बराच गोंधळ झाला. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री.विलासराव देशमुख यांनी असे आश्वासन दिले की, ज्याप्रकारे युती शासनाने एक लाख रुपयांची मदत केली, तशीच आम्ही मदत करु. प्रत्यक्षात 550 पैकी फक्त 55 शेतक-यांना कुठे 35 हजार, कुठे 40 हजार अशी मदत दिली गेली. एक लाख रुपयाची मदत

. . . .डी-2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

फार कमी म्हणजे फक्त 15-20 लोकांना मिळाली, ती मदत सर्वांना मिळाली नाही. आता प्रश्न असा निर्माण झाला की, कापसाची खरेदी सुरु झाली. सरकारने कापसाची एकाधिकार योजना सुरु केली. माननीय श्री.हर्षवर्धन पाटीलसाहेब पणन मंत्री आहेत. कापसाची खरेदी सुरु केल्यानंतर लोकांनी बी.टी.कॉटन लावला. बी.टी.कॉटनमुळे बोंडअळी कमी आली आणि कापसाचे उत्पन्न यावर्षी वाढले. खरे म्हणजे कापसाचे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील भाव कोसळले. त्यानंतर सरकारने आमचा कापूस खरेदी केला. सभापती महोदय, आपण आम्हाला न्याय द्यावा. या विधानमंडळामध्ये असणारे जे कर्मचारी आहेत, मंत्रालयात काम करणारे जे कर्मचारी आहेत, त्यांचा जर एक तारखेला पगार झाला नाही तर दोन-तीन तारखेला हाहा:कार उडतो. सरकारने आमचा कापूस खरेदी केला पण आज तीन महिने झाले तरी आमचे पैसे दिलेले नाहीत आणि आमचे कर्ज कापून घेतलेले आहे. विदर्भामध्ये 9776 गावांमध्ये 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी आलेली आहे. त्याठिकाणी आमचे पैसे कापणार नाही असे आश्वासन मागच्या अधिवेशनामध्ये आम्हाला आपल्यासमोर माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील साहेबांनी दिल्यानंतर देखील दुष्काळ असणा-या भागातील शेतक-यांचे पैसे कापून वळते करुन घेतले. पण आता आमचे पैसे देण्यास सरकार तयार नाही. शेतकरी आत्महत्या करीत आहेत. पैसे देणे ही शासनाची जबाबदारी आहे .एकाधिकार कापूस खरेदी योजना सरकारने सुरु केली. मध्यंतरी हेच माननीय उप मुख्यमंत्री विदर्भामध्ये आले आणि त्यांनी आता माझ्यासमोर खुलासा करावा. त्यावेळी त्यांनी सांगितले की, आम्ही कापसाचे लगेच पैसे देत आहोत. आर.आर.पाटीलसाहेब, तुम्ही अकोला येथे असे सांगितले की नाही ?

श्री.आर.आर.पाटील(खाली बसून) : आता सांगतो.

श्री.नितीन गडकरी : आता नुसते सांगू नका,तर पैसे द्या. नाहीतर विजेच्या बिलाच्या बाबतीत तुम्ही जसे केले, म्हणजे कॅबिनेटमध्ये निर्णय घेतला की वीज माफी देऊ.पण आता तुम्ही रोल डाऊन बॅक झाले. आता मेरिटवर चर्चा करा असे म्हणता. तेव्हा तुम्हाला मेरिट सूचले नाही का ? व्याज माफ केले तेव्हा मेरिट आठवले नाही का ? आता कापसाच्या पैशाचा जेव्हा प्रश्न येतो तेव्हा आज सरकार आमचे पैसे देत नाही. आपण या लोकशाहीच्या सार्वभौम सभागृहामध्ये बसलो आहोत. महाराष्ट्रात आत्महत्या करणा-या शेतक-यांना संरक्षण देणार आहोत की नाही ? त्यांना न्याय मिळणार आहे की नाही ?

यानंतर श्री.तलमले . . . .

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

यानंतर श्री.तलमले . . . .

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी (पुढे सुरु..

त्यांनी विकलेल्या मालाला तीन महिने होऊन सुध्दा पैसे मिळालेले नाहीत ते पैसे् सरकार त्यांना देणार आहे की, नाही? आज त्यांना सरकार पैसा द्यायला तयार नाही. आज त्यांची 3600 कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम देणे बाकी आहे. म्हणून हे शेतकरी आत्महत्या करीत आहेत.कापूस उत्पादक क्षेत्रातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत आणि याला हे काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीचे सरकार जबाबदार आहे. आज त्यांचे परिवार उध्वस्त होत आहेत, त्यांच्या विधवा रस्त्यावर फिरत आहेत, आणि त्यांच्या घरची मडकी कुडकी काढून जिल्हा सहकारी बँक लिलाव करत आहे.ते कर्ज भरु शकत नाहीत ,पैसा देऊ शकत नाहीत,त्यांची मुले शाळेत जाऊ शकत नाहीत अशी त्यांची अवस्था आहे.सभापती महोदय,काही दिवसांपूर्वीच मंत्रालयासमोर एका शेतक-याने विष पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला, आणि यापेक्षा आणखी कोणती गंभीर परिस्थिती आपल्याला अपेक्षित आहे? या परिस्थितीमध्ये या कापूस उत्पादक शेतक-यांचा सगळाचा सगळा पैसा आपण तीन दिवसाच्या आत देऊ अशाप्रकारची घोषणा करायला पाहिजे. जर आपण या महाराष्ट्रातील शेतक-यांचा हा हक्काचा पैसा तीन दिवसांमध्ये देणार असे सांगणार असाल तर मी या सभागृहामध्ये उभा राहून मा.मुख्यमंत्री,तसेच आपणा सर्वांना आणि सरकारला मनापासून धन्यवाद द्यायला तयार आहे. आज 550 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत आणि त्यांचे परिवार रस्त्यावर उभे आहेत आणि हे लाखो शेतकरी आज आपल्या हक्काच्या पैशांची मागणी करीत आहेत. ते काही आपल्याकडे भीक किंवा सबसिडी मागत नाही तर आपण त्यांचा जो कापूस विकत घेतला आहे त्या मालाचे पैसे मागत आहेत.ते तुम्हाला आमच्यावर कृपा करा म्हणत नाहीत तर आमच्या हक्काचे पैसे द्या असे म्हणत आहेत.आपण 2700 रुपये भाव देऊ म्हणून सांगितले आणि तो न देऊन त्यांचा विश्वासघात तर केलाच परंतु 1700 आणि 1800रुपये भावाने जो कापूस घेतला त्याचे सुध्दा पैसे हे सरकार त्या शेतक-यांना देत नाही.तेव्हा हा पैसा त्यांना तातडीने द्यावा आणि कापसाला 2700 रुपये भाव करावा अशी मी केंद्रीय कृषि मंत्र्यांना विनंती करतो. आज दिल्लीमध्ये आपल्या पक्षाचे सरकार आहे आणि येथे महाराष्ट्रात सुध्दा आपल्या पक्षाचे सरकार आहे. तेव्हा या कापूस उत्पादकांना न्याय देण्याकरिता , विदर्भ,मराठवाडयातील कापूस उत्पादकांकरिता मा.आर आर.पाटील यांना विचारु इच्छितो की,केंद्राकडे यासंबंधी निधी मागण्याकरिता आपला कंठ कां फुटत नाही? याकरिता 2500 कोटी रुपये पवार साहेबांकडे आपण कां मागत नाहीत ? तेव्हा माझी आपल्याला विनंती आहे की, हा जो प्रस्ताव याठिकाणी आम्ही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु...

आणला आहे त्यामधील तीव्र भावना लक्षात घेऊन आणि शेतक-यांच्या आत्महत्येसारख्या गंभीर घटना लक्षात घेऊन तातडीने या विषयावर चर्चा करुन आपण आमचे म्हणणे एकून घ्यावे.तसेच या शेतक-यांना त्यांचा पैसा तातडीने तीन दिवसामध्ये द्यावा . म्हणून या तातडीच्या आणि महत्वाच्या नियम 289 अन्वये आणलेल्या प्रस्तावावर आजच्या दिवसाचे सभागृहासमोरील सर्व कामकाज,क्रमांक एकपासून शेवटपर्यन्तचे सर्व कामकाज स्थगित करुन चर्चा घ्यावी अशी मी विनंती करतो.तेव्हा सरकारने ही चर्चा मान्य करावी आणि सभापती महोदय ,आपण या चर्चेला अनुमती द्यावी अशी विनंती करतो आणि माझे बोलणे संपवितो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारे निर्वाचित): सभापती महोदय,मा.विरोधी पक्ष नेते श्री, नितीन गडकरी साहेबांनी शेतक-यांच्या ज्वलंत प्रश्नावर चर्चा करण्याकरिता आजचे सभागृहासमोरील सर्व कामकाज स्थगित करुन शेतक-यांच्या प्रश्नावर शासनाकडून काही ठोस आश्वासन मिळावे याकरिता हा नियम 289 अन्वये प्रस्ताव मांडला आहे. प्राथम्याने महाराष्ट्रातील शेतक-यांना न्याय मिळावा म्हणून हा प्रस्ताव त्यांनी दिलेला आहे.सभापती महोदय,मा. उपमुख्यमंत्री महोदय हे शेतकरी आहेत आणि असे असतांना शेतक-यांचा विषय आम्ही उपस्थित केल्यानंतर ते मध्येच उठून तिसराच विषय या ठिकाणी उपस्थित करण्याचा प्रयत्न करतात हे बरोबर वाटत नाही.मा.श्री. दिलीप वळसे पाटील साहेब सुध्दा शेतकरी कुटुंबातील आहेत आणि असे असतांना सुध्दा त्यांनीही तशाच प्रकारचा केविलवाणा प्रयत्न करावा याचे मला दु:ख वाटते.त्यांनी कमीतकमी शेतक-यांच्या व्यथा तरी ओळखल्या पाहिजेत. आम्ही शहरवासी त्या व्यथा ओळखू शकलो नाही तर कदाचित ते एक वेळा क्षम्य असू शकेल परंतु शेतक-यांकडून ही अपेक्षा नाही. हे सरकार शेतक-यांचे सरकार म्हणून ओळखले जात असतांना हे सरकार शेतक-यांबाबत अशाप्रकारे वागत असेल तर ते बरोबर नाही.

यानंतर कु. थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार....

नको तो मेसेज आपण यातून महाराष्ट्रातील शेतक-यांसमोर पाठवित आहात. त्यांच्या मतावर तुम्ही निवडून आला आहात. तुम्ही जो जाहीरनामा काढला होता, त्या जाहीरनाम्यामध्ये तुम्ही जाहीरपणे कबूल केलेले आहे की, आम्ही शेतक-यांच्या कापसाला 2700 रुपये भाव देऊ. तुमचे शासन सत्तेवर आल्यानंतर हे दुसरे अधिवेशन सुरु झालेले आहे. या अधिवेशनात या शासनाची पूर्णतः जबाबदारी होती. जाहीरनाम्यात जे मान्य केलेले आहे, त्याचा प्रथम स्वीकार करा, ते मान्य करा आणि नंतर पुढच्या विषयाकडे या. आपण हा विषय असाच ठेवून दिला आहे. विदर्भ आणि मराठवाडयात शेतकऱ्यांच्या आत्महत्या चाललेल्या आहेत. पण हया आत्महत्या मंत्र्यालयाच्या दारात येऊन उभ्या राहिल्या आहेत. चार-चार दिवस शेतकरी येथे येतात आणि माननीय मुख्यमंत्री किंवा माननीय उपमुख्यमंत्र्यांना भेटण्याचा प्रयत्न करतात. आपण मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री

झाल्यानंतर सामान्य शेतक-याला भेटावयाला मागत नाही. नाईलाज म्हणून तो शेतकरी आपल्या मंत्रालयाच्या दरवाज्यासमोर विष प्राशन करुन मरण्याचा प्रयत्न करतो. ही या महाराष्ट्र राज्याची आणि हे महाराष्ट्र शासन चालविणा-या सगळया राजयकर्त्यांची अत्यंत शोकांतिका आहे. अशोभनीय असे हे कृत्य आहे. असे व्हायला नको होते. पण ते घडले आहे. तो शेतकरी आज प्राणांतिक वेदना सहन करीत रुग्णालयात पडलेला आहे. तो बिचारा आयुष्याचे शेवटचे अंक मोजीत आहे आणि शासन चैन, ऐषबाजीमध्ये आम्हाला येथे चहापान ठेवते. आम्हाला चहापानाला बोलावते. या चहापान घेऊ या, एकत्र बसू या , चर्चा करु या आणि विषयाची मांडणी करु या.आमच्यासमोर प्रश्न आहे तो हाच आहे. कधी चैन करायची? चहापान कधी करावयाचे? महाराष्ट्रसमोर कोणत्या ज्वलंत समस्या आहेत, याचा आपण विचार करावयाला नको का? आपण राज्यकर्ते आहात नां? ज्या पध्दतीने तुम्ही सत्तेवर आला आहात, त्या पध्दतीमध्ये हे विषय बसतात काय? याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. ज्या शेतक-यांनी आत्महत्या केल्या त्यांना एक-एक लाख रुपये देऊ असे नागपूर अधिवेशनात सांगितले होते. शासनाने कबूल केल्या प्रमाणे किती शेतक-यांच्या घरी एक-एक लाख रुपये पोहचवलेत याची माहिती सदनामध्ये द्यावी. या विषयावर आम्ही नंतर सविस्तर बोलणार आहोत. म्हणून आमची मागणी अशी आहे की, हा प्रस्ताव मान्य करुन या विषयावर प्रथम चर्चा घ्यावी आणि ही संपूर्ण चर्चा आटोपल्यावर आजचे दिवसाचे कामकाज

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

सदनासमोर आणावे, ही विनंती करण्यासाठी आज आम्ही येथे उभे आहोत. याच कामकाजाचा एक भाग म्हणून सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. नितीन गडकरी यांनी सुरुवातीलाच हा विषय येथे मांडण्याचा प्रयत्न केला. आजचा शपथविधी उद्या होऊ शकतो. प्राण जाणा-या त्या शेतक-याचा प्राण आज जाण्याऐवजी तो उद्या जाईल असे आपण म्हणू शकत नाही. शेतक-यांविषयी जिव्हाळा दाखवा, शेतकऱ्याविषयी आपुलकी दाखवा. शेतकऱ्यांविषयी प्रेम दाखवा. शेतक-यांना सगळया प्रकारची मदत करा. सभापती महोदय, आपण सुध्दा एक शेतकरी आहात. आणि शेतकरी कुटुंबातून आलेली आपण सगळी माणसे अशा पध्दतीने या सदनामध्ये शेतक-यांच्या विषयाच्या बाबतीत इतका बेजबबदारपणा दाखवित असतील तर ते महाराष्ट्र राज्याला भूषणावह नाही, हे मला या ठिकाणी अत्यंत विनम्रपणे सांगावयाचे आहे. आणि म्हणून माझी सदनाला विनंती आहे की, आजच्या कामकाज पत्रिकेवरील सगळे विषय बाजूला ठेवून, नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव स्वीकारुन या विषयावर चर्चा करावी व त्यावर शासनाने निवेदन करुन हा विषय मार्गी लावावा, अशी मी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, नियम 289 अन्वये आजच्या दिवसाचे कामकाज तहकूब करुन महाराष्ट्राच्या ज्वलंत विषयाला न्याय द्यावा, अशी विनंती करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. खरे म्हणजे आपण या सदनामध्ये आमच्यासोबत शेतक-यांच्या विविध प्रश्नावर आपले मत मांडीत होतात. आपली शेतक-यांबद्दलची जी मते आहेत, त्या मतांचा आदर करुन, मतदान हा विषय यामध्ये येणार नाही. शेतक-यांच्या हिताकरिता आपण निर्णय घेऊन या विषयाला न्याय द्याल अशी मला खात्री आहे. मी या विषयावर फार मोठे भाषण करण्यासाठी उभा नाही. या विषयावरील चर्चेला मान्यता दिली तर आम्ही निश्चितपणे भाषणे करु. सभापती महोदय, शेवटी आई-वडिलांचे काही संस्कार असतात. मला असे वाटले होते की, आपण ग्रामीण भागातून आलेले आहात. वर्षा-नु-वर्षे ज्यांच्या वडिलांनी शेतक-यांची सेवा केली त्यांचे सुपुत्र आज येथे शपथ घेणार होते. तेच उभे राहून बोलले असते की, शेतक-यांचा प्रश्न महत्वाचा आहे, माझा शपथविधी नंतर झाला तरी चालेल, पण आज शेतक-यांच्या प्रश्नावर प्रथम चर्चा करा. मला असे वाटले होते की, ते या ठिकाणी उठून तसे सांगतील आणि मग त्यांच्या वडिलांना सुध्दा धन्यता वाटली असती की, वा अशा एका सुपुत्राला मी जन्म दिला. आज त्याने महाराष्ट्रात नांव केले. पण तसे झालेले नाही याचा मला खेद होतो.शेवटी सत्तेसाठी हपापलेली माणसे कशी असतात याचे आज त्यांच्याकडून प्रात्यक्षिक अपेक्षित नव्हते.ठीक आहे. ते तरुण आहेत. लहान आहेत. त्यांना अनुभव कमी आहे. त्यांना वरुन चिठ्ठी खाली यावयास पाहिजे होती पण यांची खालून चिठ्ठी वर गेली. चर्चेच्या वेळेला आम्ही शेतक-यांच्या आत्महत्येसंबंधीचे सगळे मुद्दे मांडू. परभणीला मी गेलो होतो. सगळीकडे मी जाऊन आलो. ज्या शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत, त्याचे वर्णन चर्चेच्यावेळी निश्चितपणे करता येईल.

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धीत प्रत / मुद्रणासाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

परभणीचा श्री. गोपाळ वैजनाथ शिंदे हा 18 दिवस दोन गाडया घेऊन उभा होता. धो धो पाऊस पडावयास लागल्यानंतर संपूर्ण कापूस भिजल्यामुळे माझा कापूस घेणार कधी ? आता तो घेतला जाणार नाही असे त्याला वाटले. सन्माननीय सदस्या प्रा. फौजीया खान या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांना हे प्रकरण माहीत आहे. त्या एका धसक्याने त्या शेतकऱ्याचा तिथल्या तिथे प्राण गेला. सर्व शेतकऱ्यांनी मिळून त्या जिनिंगवर त्याचा अंत्यविधी केला. या शासनाचा निषेध करण्याकरिता त्या लाईनमध्ये असलेल्या सर्व शेतकऱ्यांनी मिळून त्या शेतकऱ्याचा त्या ठिकाणी अंत्यविधी केला. मी स्वत: त्या ठिकाणी गेलो. सभापती महोदय, एका शेतकऱ्याची आत्महत्या झाली. त्यांनी पत्र लिहिलेले आहे. त्या आत्महत्येचाही विषय या सभागृहामध्ये येणारच आहे. काल सकाळी साडेसहा वाजता त्याच्या विधवा पत्नीचा मला फोन आला. साहेब नंतर भेटणार नाहीत म्हणून पहाटे साडेसहा वाजता त्या माऊलीने फोन करुन सांगितले की, पोलीस लक्ष देत नाहीत. कोणी लक्ष देत नाही. आपण इकडे येऊन गेलात. वाईट एवढेच वाटते की, माननीय श्री. पाटील साहेब, ते घराणे तुमच्या पक्षाशी निष्ठावंत आहे. मी गेलो त्यावेळी ते म्हणाले, साहेब तुम्ही आलात. तुमची बांधिलकी त्यांनी मला सांगितली. एवढया विदीर्ण अवस्थेमध्ये, उध्वस्त अवस्थेमध्ये ज्यावेळी शेतकरी येतो त्यावेळी तुम्ही कोण आणि आम्ही कोण हा प्रश्न कृपा करुन या ठिकाणी उपस्थित व्हावयास नको. या सभागृहामध्ये आपण कोणत्या पक्षाचे आहोत हा विषय उपस्थित व्हावयास नको. या सदनामध्ये आज जर या विषयावर चर्चा झाली आणि शेतकऱ्यांच्या व्यथा या ठिकाणी जाहीरपणे मांडण्याची संधी मिळाली तर शेतकऱ्यांना कोठे तरी आधार वाटेल असे मला वाटते. सत्ता कोणाचीही असू द्या आणि विरोधी पक्षामध्ये कोणीही असू द्या पण विधिमंडळामध्ये शेतकऱ्यांच्या समस्येकरिता कोठे तरी, कोणी तरी बोलतात, त्यांच्या व्यथा मांडतात, शेतकऱ्यांच्या व्यथेबद्दल सरकार त्यांची भूमिका मांडते असे आगळेवेगळे आशावादी चित्र निर्माण होईल. मला यासंदर्भात नक्की भाषण करावयाचे आहे. या विषयाला आपण मान्यता द्यावी अशी विनंती करतो. त्याच वेळेला एक गोष्ट मी माननीय डॉक्टर साहेबांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. ज्यावेळी मी ट्रेनमधून प्रवास करीत होतो त्यावेळी सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय आमदार माझ्याबरोबर गप्पा मारत बसले होते. त्यावेळी आमचे शिवसेनेचे कापसाचे आंदोलन अतिशय तीव्र स्वरुपात चालू होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

श्री. दिवाकर रावते .....

ते मला म्हणाले की, रावते साहेब, तुम्ही एवढी जीवापाड मेहनत करीत आहात याचा मला आनंद वाटतो, बरे वाटते पण एकच सांगतो की, सत्ता येऊन आता तीनच महिने झालेले आहेत, आणखी पाच वर्षे काढावयाची आहेत, लोक विसरुन जातील. आमच्या आमदारांची शेतकऱ्यांबद्दलची अशी भावना आहे त्याबद्दल काय म्हणावयाचे ? सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील हे सभागृहाचे नेते आहेत. त्यांना विनंती करतो की, ज्या जाणिवेने महाराष्ट्राच्या समाजामध्ये आपल्याला हेरले जाते त्या जाणिवा आपण कायम ठेवा. सभापती महोदय, आपल्या सर्व भावना सगळया महाराष्ट्राला माहीत आहेत. म्हणून मी आपल्याला विनंती करतो की, इतर सर्व कामकाज रद्द करुन हा प्रस्ताव सभागृहामध्ये मांडण्याकरिता आपण मान्यता द्यावी. सभागृहातील आम्ही सर्व सन्माननीय सदस्य कोणत्याही पक्षाचे असलो तरी ग्रामीण भागातील जे उध्वस्त झालेले शेतकरी आहेत त्यांची बांधिलकी जपत आहोत. त्यांच्या समस्यांवर चर्चा करुन त्यांना आधार देणारे कोणते तरी काम करीत आहोत असा संदेश सदनातून बाहेर गेला पाहिजे. शेवटी आपण नाही म्हटले तर शेतकऱ्यांकरिता गोंधळ केला, सभागृह चालू दिले नाही, हे तर होणारच. परंतु असे करण्यापेक्षा सन्मानाने त्या शेतकऱ्यांच्या व्यथा सभागृहात मांडण्याकरिता आपण संधी द्यावी अशी मी आपल्याला विनंती करतो आणि आपल्याकडून ती अपेक्षा व्यक्त करतो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. नितीन गडकरी साहेबांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्या प्रस्तावाच्या संदर्भात आणखी दोनच मुद्दे सांगण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. सभापती महोदय, या ठिकाणी विरोधी पक्ष नेते बोलत असताना त्यांनी 550 आत्महत्या झाल्याचे सांगितले. आज विधानसभेमध्ये प्रश्नोत्तराची जी यादी देण्यात आली त्यामध्ये अनुक्रमांक 7 वर शेतकऱ्यांचा आत्महत्येचा जो प्रश्न आहे त्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी असे उत्तर दिले आहे की, "गेल्या सहा महिन्यामध्ये 250 आत्महत्या झाल्या." हे उत्तर सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी विधानसभेतील प्रश्नाला दिलेले आहे. याचा अर्थ शासन सुध्दा हे मान्य करते. 550 आत्महत्यांचा आकडा त्यांनी नमूद केला नसेल. तो आणखी वेगळया चर्चेचा विषय आहे. योग्य वेळी आम्ही ते समोर आणू. परंतु 250 आत्महत्या झाल्याचे शासन मान्य करते तरी सुध्दा आज हा विषय या ठिकाणी आणला असताना आधी बाकीचे विषय घ्या असे म्हटले तर त्याचा निषेध करावा तेवढा थोडा आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत...

सभापती महोदय, आजही शेतक-यांचा कापूस खरेदी करण्याचे बंद केलेले आहे. कापसाला 2700 रुपये भाव देऊ असे सांगितले होते, प्रत्यक्षात 2500 रुपये भाव जाहीर केला. पण 2000 रुपयापेक्षा जास्त भाव कोणत्याही शेतक-याला दिलेला नाही. म्हणून या प्रश्नावर शेतक-यांच्या भावना तीव्र झाल्या आहेत. शेतक-यांच्या नावाने डांगोरा पिटला जातो, शेतक-यांचे प्रतिनिधी म्हणवून घेता, केंद्रामध्ये कृषी मंत्री आपल्या पक्षाचे आहेत. मध्यंतरी निवडणुकीच्या काळामध्ये वेळ आली तर शेतक-यांच्या प्रश्नासाठी केंद्राची तिजोरी खाली करु आणि शेतक-यांना न्याय देऊ असे जाहीर केले गेले. केंद्राची तिजोरी खाली करण्याचे राहिलेच. कारण केंद्रीय अर्थसंकल्पाच्या माध्यमातून केंद्राची भाषा कशी बदलत आहे ते स्पष्ट झालेले आहे. म्हणून मी याठिकाणी नम्र विनंती करतो की, मा.विरोधी पक्ष नेत्यांनी मांडलेला प्रस्ताव चर्चेस घ्यावा. सभागृहासमोरील सर्व कामकाज बाजुला ठेवावे आणि नियम 289 अन्वये प्रस्ताव चर्चेला घ्यावा. काही दिवसापूर्वी एक घटना घडली होती. मंत्रालयासमोर एका शेतक-याने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला ही अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे, महाराष्ट्राला हा कलंक आहे. पण राज्यकर्त्यांना हा कलंक वाटत नाही याचे दु:ख आहे म्हणून ही चर्चा घेण्यात यावी, ही मागणी मान्य करावी अशी विनंती करतो आणि येथे थांबतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MHM/

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मा.विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 289 अन्वये याठिकाणी चर्चा करण्याची परवानगी मागितलेली आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे. नागपूरच्या अधिवेशनामध्ये हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता त्यावेळी सरकारकडून सांगण्यात आले होते की, पुढील 3 महिन्यामध्ये एकाही कापूस उत्पादक शेतक-याचे पेमेंट देण्याचे शिल्लक राहणार नाही. आपल्या उपस्थितीमध्ये ही चर्चा झाली असताना याठिकाणी सरकारकडून सांगितले होते, या उलट गेल्या 3 महिन्यात महाराष्ट्रात एकाही कापूस उत्पादक शेतक-याचे पेमेंट दिले गेले नाही. आपण मान्यता दिल्यानंतर चर्चा होईल त्यावेळी मी विस्ताराने यावर बोलेन. मा.विरोधी पक्ष नेते श्री.नितीन गडकरी यांनी याविषयी चर्चा उपस्थित करण्याची मागणी केलेली आहे त्याला पाठिंबा देतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MHM/

प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सभागृहासमोर एक महत्वाचा प्रश्न आलेला आहे. कापूस हे मुख्यत्वे करुन राज्यातील कोरडवाहू पीक आहे. एखाद दुसरा जिराईत भाग सोडला तर बाकी सर्व भाग कोरडवाहू आहे. हे कास्तकार मोठ्या प्रमाणावर पाटाच्या पाण्यावर कापसाचे पीक घेत नाहीत. कापसाचे पीक अतिशय मेहनत करुन घेतले जाते. कापूस हे पीक प्रामुख्याने विदर्भ व मराठवाडयातील जिल्हयांमध्ये घेतले जाते. त्यांनी पिकविलेले धन त्याचे हक्काचे पैसे त्यांना मिळत नाही आणि ते केव्हा मिळतील हे त्यांना माहीत नाही हे महत्वाचे दु:ख आहे. ही योजना जवळजवळ 1994 पर्यंत त्यातही एखाद्या वर्षाचा अपवाद सोडल्यास उर्वरित काळात फायद्यामध्ये चालू होती. सरकारने कापूस उत्पादक शेतक-यांना संरक्षण दिलेले होते. आज कोरडवाहू कास्तकारांना आपल्या मालाचा पैसा केव्हा मिळेल याचीही शाश्वती नाही. हे चर्चा करण्याचे ठिकाण आहे, शासनाचे निर्णय जाणून घेण्याचे ठिकाण आहे. एवढया महत्वाच्या सार्वजनिक प्रश्नावर चर्चेच्या माध्यमातून लोकांच्यासमोर भूमिका येण्याची आवश्यकता आहे यादृष्टीकोनातूनच या प्रश्नाचा विचार करावा आणि या चर्चेला परवानगी द्यावी अशी विनंती करतो आणि येथे थांबतो.

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MHM/

श्री.आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आणि त्यांच्या सगळया सहका-यांनी नियम 289 अन्वये सगळे नियम शिथिल करुन कापसाच्या प्रश्नावर याठिकाणी चर्चा व्हावी अशी मागणी केलेली आहे. याबाबतीत शासनाची भूमिका आणि बाजू ऐकून घ्यावी अशी मी सुरुवातीलाच विनंती करतो. वास्तविक काल अधिवेशनाचा पहिला दिवस होता आणि ख-या अर्थाने कामकाज आजच सुरु झाले आहे. मी मा.विरोधी पक्ष नेत्यांनी विदर्भात केलेली काही भाषणांची माहिती घेतली आणि त्याची कात्रणेही मिळविली आहेत.

नंतर श्री.शिगम.....

आव्हाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील पुढे सुरु...)

यापूर्वीही त्यांनी घोषित केलेले आहे की, कापसाच्या प्रश्नावर सरकारला धारेवर धरु, या प्रश्नावर अधिवेशन बंद पाडू. अधिवेशने ही चालविण्यासाठी असतात, ती बंद पाडण्यासाठी नसतात. आपण चर्चेने प्रश्न संपविले पाहिजेत ही माझी आपणास सुरुवातीला सूचना राहील. ज्या पोटतिडिकीने कापूस उत्पादक शेतक-यांच्या अडचणी या सदनामध्ये मांडल्या त्या पेक्षा शासनाची वेगळी भूमिका नाही. आपल्या भूमिकेसारखीच सरकारची भूमिका आहे. या राज्यातील शेतक-याला, कास्तकाराला न्याय मिळाला पाहिजे, त्याच्या कुटुंबामध्ये सुखा-समाधानाचे चार दिवस निर्माण झाले पाहिजेत, ही ध्येय-धोरणे ठेवून आजपर्यन्त महाराष्ट्रातील प्रत्येक राज्यकर्त्यांनी कास्तकाराला, शेतक-याला केन्द्रबिंदू मानूनच कामकाज केलेले आहे. राज्यातील कोणत्याही विभागातील शेतकरी कोणत्याही पिकाच्या बाबतीत अडचणीत आला तर मदत करण्याचा दृष्टीकोन नेहमीच राहिलेला आहे. हे आम्ही नाकारत नाही की, जाहीरनाम्यामध्ये 2700 रुपये भाव देण्याचे वचन काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने महाराष्ट्रातील जनतेला दिले होते. सभापती महोदय, जाहीरनामा हा 5 वर्षासाठी असतो. 5 वर्षात तेथपर्यन्त पोहोचायचे आहे. अशा पध्दतीचा संकल्प जाहीरनाम्याच्या माध्यमातून केला जातो. या राज्यातील कापूस उत्पादक शेतक-याला क्विंटलला 2700 रु. भाव मिळाला पाहिजे असे आश्वासन दिलेले आहे आणि ते पूर्ण करण्यासाठी सरकारकडे तब्बल पावणेपाच वर्षाचा कालावधी बाकी आहे.

श्री. नितीन गडकरी : माझा हरकतीचा मुद्दा आहे.एका मुद्याच्या बाबतीत माननीय उपमुख्यमंत्र्यांनी खुलासा करावा अशी माझी विनंती आहे. मा.उपमुखमंत्री, आपण पावणेपाच वर्षात कापसाला 2700 रु. भाव देणार आहात. याचा अर्थ उरलेल्या चार-पावणेपाच वर्षात ही कापूस एकाधिकार योजना चालू राहील. कारण पुढच्या पावणेपाच वर्षात आपण 2700 भाव देणार आहात. आपण 2700 रु. भाव देणार आहात याबद्दल मी आपले स्वागत करतो. आपण खुलासा करावा... सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे.

सभापती : विचारलेल्या प्रश्नाला नेमके कोणते उत्तर द्यावे याची सक्ती करता येणार नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझे म्हणणे एवढेच आहे की, माननीय उपमुख्यमंत्र्यांनी पावणेपाच वर्षात कापसाला 2700 रु. भाव देणार असे सांगितले. याचा स्पष्ट अर्थ असा होतो की, पुढील 4 वर्षे कापूस एकाधिकार योजना चालू राहणार आहे. त्यांनी सभागृहामध्ये

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/

(श्री. नितीन गडकरी पुढे सुरु...)

जे सांगितले त्याचे मी समर्थन करतो. या वर्षी जर 2700 रु. भाव देता येणार नसेल तर तो पुढच्या वर्षी द्यावा, पुढच्या वर्षी देता आला नाही तर त्याच्या पुढच्या वर्षी तो द्यावा. तुमच्या जाहीरनाम्यातील आश्वासन तुम्हाला 5 वर्षात पूर्ण करायचे आहे. तेव्हा आपण ही कापूस एकाधिकार योजना पुढील चार वर्षे चालू ठेवणार आहात याबद्दल मी तुमचे विरोधी पक्षाच्या वतीने अभिनंदन करतो, तुम्हाला धन्यवाद देतो. ही गोष्ट रेकॉडवर आलेली बरी.

श्री. आर.आर.पाटील : या गोष्टी जाहीरनाम्यातून वाचल्या गेल्या आहेत.

सभापती : माननीय उपमुख्यमंत्र्यांनी आशय लक्षात घ्यावा.

श्री. आर.आर.पाटील : आशय माझ्या लक्षात आलेला आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांची मागणी माझ्या लक्षात आली आहे. मी एवढीच आठवण करुन देईन की, युतीच्या काळात 27 लाख तरुणांना नोक-या देण्याचे आणि 40 लाख लोकांना घरे बांधून देण्याचे आश्वासन दिले होते. जे आश्वासने पाळतात...

श्री. नितीन गडकरी : मी माननीय उपमुख्यमंत्र्यांचे स्वागत केले, त्यांचे अभिनंदन केले. या वर्षी त्याना 2700 रु. भाव देता येत नाही. मला त्यांची अडचण मान्य आहे. या वर्षी जरी 2700 रु. भाव देता येत नसला तरी पुढच्या पावणेपाच वर्षाच्या काळात हा 2700 रु. भाव देण्यात येणार आहे. वचननामा पाच वर्षात पूर्ण केला जातो. तेव्हा माननीय उपमुख्यमंत्र्यांनी आता पुन्हा मागे जाऊ नये. यावर्षी जर 2700 रु. भाव देता येत नसेल तर काही हरकत नाही. पुढच्या वर्षी 2700 रु. भाव द्यावा किंवा पुढच्या 4 वर्षात तो द्यावा.

...नंतर श्री.गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

या तुम्ही सभागृहात आश्वासन दिलेले आहे. आश्वासन दिल्याप्रमाणे तुम्हाला कापूस एकाधिकार योजना चालू ठेवावी लागेल. तुम्ही ते मान्य केले आहे. तुम्ही जे आश्वासन दिले त्याबाबतीत मी तुमचे स्वागत केलेले आहे...

श्री. आर.आर.पाटील : दिलेल्या आश्वासनाची पूर्तता जे स्वत: करतात, त्यांनाच दुस-यांनी दिलेल्या आश्वासनाबद्दल अधिकचा आग्रह धरता येतो एवढेच मला म्हणावयाचे आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आमच्या सदस्यांकडून आपल्याला विनंती केलेली आहे की, आम्हाला या विषयावर नियमानुसार सभागृहात चर्चा करावयाची आहे. ही चर्चा सभागृहात उपस्थित झाल्यानंतर या विषयाच्या बाबतीत काय मुद्दे मांडावयाचे ते आम्ही मांडू. ज्याला आपण प्रिअँबल म्हणतो, प्रारंभिकता म्हणतो, या बाबतीत आमच्या भावना काय आहेत? कापसाला भाव दिला गेला की नाही? कापूस उत्पादक शेतक-याला पैसे दिले की नाही? कापसाच्या खरेदीमध्ये शेतक-यांची झालेली ससेहोलपट हा विषय आहे, व्यापा-यांनी या सरकारला कसे लुटले हा विषय आहे, व्यापा-यांना सरकारने कशी साथ दिली हा विषय आहे, कापूस खरेदी व्यवहारातील धोळामुळे महाराष्ट्रातील शेतकरी कसे उध्वस्त झाले हा एक विषय आहे, असे अनेक विषय असताना या विषयावर सभागृहात चर्चा होण्याची आवश्यकता आहे. परंतु या संदर्भात माननीय उप मुख्यमंत्री काहीही न बोलता केवळ युतीच्या सरकारने काय केले, काय केले नाही हे सांगण्यातच आपली धन्यता मानत आहेत. तसेच त्यांनी आघाडी सरकारच्या जाहीरमान्याबाबत उल्लेख केला. त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, तुमच्या जाहीरनाम्याचे काय करावयाचे असेल ते करा. आम्हाला यासंबंधीची माहिती आता नको आहे. ज्यावेळी या विषयावर चर्चा होईल त्यावेळी ही संपूर्ण माहिती ते देऊ शकतात. या विषयावर सभागृहात चर्चा उपस्थित करण्यात येईल त्यावेळी युती सरकारने काय केले आणि आघाडी सरकारने काय केले यावर आपण सविस्तर चर्चा करु.

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 289 अन्वये सभागृहापुढील कामकाज थांबवून या विषयावर चर्चा घ्यावी अशा पध्दतीची सूचना दिलेली आहे. या सूचनेच्या अनुषंगाने या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. या विषयाच्या अनुषंगानेच माननीय उप मुख्यमंत्री हे त्यांची बाजू मांडण्यासाठी सभागृहात उभे राहिले आहेत...

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : आमचा जाहीरनामा, त्यांचा जाहीरनामा यासंबंधी माननीय उप मुख्यमंत्री उल्लेख करीत आहेत..

श्री. आर.आर.पाटील : विरोधी पक्षाच्या सदस्यांकडून जाहीरनाम्याचा उल्लेख केला म्हणून मला त्यांच्या जाहीरनाम्याचा उल्लेख करावा लागला. सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आणि त्यांच्या सहका-यांनी कापूस उत्पादक शेतक-यांबद्दल ज्या भावना व्यक्त केल्या आहेत. तशाच भावना आमच्या देखील आहेत. कापूस उत्पादक शेतक-यांच्या बाबतीत आमच्या भावना वेगळया नाहीत. या वर्षी बी.टी.कॉटन पीक घेतल्यामुळे आणि एकंदर जगातच कापूस पिकाचे उत्पादन मोठया प्रमाणात झाल्यामुळे जागतिकक बाजारपेठेत कापसाला प्रचंड मंदी आली. त्यामुळे कापसाचे दर कोसळले. अशा स्थितीमध्ये कापूस खरेदीमुळे फार मोठा तोटा होईल, घेतलेला कापूस खपणार नाही अशा पध्दतीच्या सूचना राज्यातील अनेक अर्थतज्ञांकडून केलेल्या असताना सुध्दा राज्यातील कापूस उत्पादक शेतकरी वाचला पाहिजे,प्रसंगी कितीही तोटा झाला तरी चालेल म्हणून कापूस उत्पादकाच्या बाजूने सरकारने खंबीर भूमिका घेतली आहे. नफा-तोट्याचा विचार करणारे सरकार असते तर अशा परिस्थितीत जागतिक स्तरावर कापसाची मोठया प्रमाणात घसरण होत असताना देखील सरकारने अशा प्रकारचा निर्णय घेतला नसता. एका बाजूने शेतकरी अडचणीत आलेला आहे, त्याला मदत केली पाहिजे. राज्यातील कापूस उत्पादक शेतक-यांना मदत करण्यासाठी प्रसंगी कर्ज काढू, पण या अडचणीत काळात शेतक-याला न्याय देऊ. शासनाने राज्यातील शेतक-यांचा मोठया प्रमाणात कापूस खरेदी केलेला आहे. राज्याच्या इतिहासामध्ये कधी नव्हे इतक्या मोठया प्रमाणात या वर्षी शासनाने शेतक-यांचा कापूस खरेदी केलेला आहे. कापूस खरेदीच्या संदर्भात आमचा जो उच्चांक होता. तो उच्चांक आम्ही या वर्षी मोडलेला आहे. जवळपास 2 लाख 10 हजार क्विंटल कापूस या वर्षी राज्य शासनाने खरेदी केलेला आहे. एका बाजूला राज्यात काही परिसरामध्ये दुष्काळ पडलेला आहे.दुस-या बाजूला कापूस एकाधिकार योजनेमध्ये फार मोठया प्रमाणात कापूस आलेला आहे. कदाचित काही प्रमाणात बी.टी.कॉटनचे उत्पादन वाढले असेल, परराज्यातील कापूस या योजनेच्या माथ्यावर दलालांमार्फत बसण्याची शक्यता आहे. अशी परिस्थिती असली तरी आम्ही तोटा सहन करुन राज्यातील शेतक-यांना न्याय देऊ अशा प्रकारची ठाम भूमिका शासनाने घेतलेली आहे. या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांकडून सांगितले गेले की, कापूस उत्पादक शेतक-यांना पैसे मिळाले नाहीत.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील...

हमी भावाप्रमाणे 3600 कोटी रुपयांची कापूस उत्पादक शेतक-यांची देय असलेली रक्कम आहे. दरवर्षी काही रक्कम शासनामार्फत कापूस एकाधिकार योजनेस दिली जात असते व ती रक्कम कापूस उत्पादक शेतक-यांना योजनेच्या माध्यमातून वाटप केले जाते. या योजनेच्या माध्यमातून जो कापूस विकला जातो त्यातून जी रक्कम येते ती रक्कम कापूस उत्पादक शेतक-याला देत असतो. परंतु दुर्देवाने या वर्षी टेंडर काढून सुध्दा एकही ग्राहक कापूस खरेदी करण्यासाठी पुढे आला नाही.

यानंतर श्री. उपरे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.आर.आर.पाटील)

त्यामुळे सरकारकडे असलेल्या कापसाच्या गाठी तशाच पडून आहेत. त्यांची विक्री होत नाही. अशा अडचणीच्या काळात 1238 कोटी रुपयांचे वाटप करण्यात आलेले आहे. 3600 कोटी रुपयांपैकी 1238 कोटी रुपये वाटले तरी अजूनही साधारणत: 2400 कोटी रुपये शेतक-यांना देणे बाकी आहेत. त्यामुळे राज्य सहकारी बँकेबरोबर माननीय मुख्य मंत्र्यांनी, माननीय पणन मंत्र्यांनी एक बैठक घेऊन राज्य सहकारी बँकेने अधिकचा कर्जपुरवठा केला पाहिजे अशा त-हेची आग्रही भूमिका घेतली गेली. दोन दिवसांपूर्वी राज्य सहकारी बँकेला तशा पध्दतीचे आदेशही दिलेले आहेत आणि 1200 कोटी रुपये त्यांनी आणखी मंजूर केलेले आहेत. येत्या तीन दिवसांच्या आत या 1200 कोटी रुपयांच्या वाटपाचे काम सुरू होईल आणि जे 1200 कोटी रुपये अजूनही शिल्लक राहतात त्याबाबतीत स्टेट बँकेबरोबर चर्चा करण्यात येईल आणि प्रसंगी मार्केटमधून कर्ज काढून शेतक-यांचे पैसे लवकरात लवकर देण्यासाठी शासन प्रयत्न करील. आर्थिक परिस्थिती अडचणीची असताना, कोट्यावधी रुपयांचा तोटा सहन करण्याची भूमिका शासन घेत असताना विरोधासाठी विरोध करण्याची भूमिका विरोधी पक्षाने न घेता सरकारला सहकार्य करण्याची भूमिका घेतली पाहिजे. अध्यक्ष महोदय, 1238 कोटी रुपये शेतक-यांना रोख दिलेले आहेत. 1200 कोटी रुपये तीन दिवसांच्या आत दिले जातील आणि एखाद्या महिन्याच्या आत 1200 कोटी रुपये म्हणजेच उरलेले सगळे पैसे दिले जातील.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण चर्चेला परवानगी दिलेली आहे काय ?

सभापती : या ठिकाणी आपणास ज्या पध्दतीने या सूचनेच्या अनुषंगाने बोलण्यासाठी मी परवानगी दिली. त्याच पध्दतीने माननीय उप मुख्यमंत्री महोदयांना यावर काही भाष्य करावयाचे असेल तर त्यासाठी परवानगी दिली. हे भाष्य करीत असताना त्यांनी कोणती गोष्ट सांगितली हे मी तपासून पाहिन. मला असे वाटते की, यावर आपण सविस्तर चर्चा केलेली आहे.

श्री.नितीन गडकरी : नियम 289 अन्वये चर्चा करण्याचे आपणास मान्य आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : अध्यक्ष महोदय, कोणत्याही चर्चेचा हेतू लोकांना न्याय देणे हा असतो आणि एका बाजूने सरकारने शेतक-यांना न्याय देण्याची भूमिका स्वीकारलेली असताना नियमितपणे चालणारे सभागृहाचे जे कामकाज आहे त्यामध्ये व्यत्यय आणण्याची भूमिका विरोधी पक्षाने घेऊ नये. सहकार्याने आणि समंजसपणाने आपण सभागृहाचे कामकाज केले पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.आर.आर.पाटील)

सरकारला जे काही करता येईल ते सगळे करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तरी या चर्चेच्या संदर्भात कामकाज सल्लागार समितीमध्ये आपण चर्चा करू आणि त्या ठिकाणी कापसाच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी जो दिवस आणि वेळ निश्चित करण्यात येईल त्या प्रमाणे चर्चा करण्याची सरकारची तयारी आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्यासाठी उभे असतात.)

सभापती : सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. मला आपला प्रश्न समजला आहे. नियम 289 आपण सूचना दिलेली आहे. त्या सूचनेच्या अनुषंगाने विषयाचे महत्व पटविण्यासाठी मी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना आणि काही सन्माननीय सदस्यांना या ठिकाणी त्यांचे विचार मांडण्यास परवानगी दिली. त्यानंतर सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यानी संदर्भात काही विचार मांडले. त्यांनाही मी परवानगी दिली. दरम्यानच्या काळात काही आकडेवारी देण्यात आली. तरी यासंदर्भात माझा जो निर्णय आहे तो मी आता सांगतो. दोन्ही बाजूंचे म्हणणे मी ऐकून घेतले आहे. तरी नियम 289 अन्वये जी सूचना दिली आहे तिला मी परवानगी नाकारीत आहे. आता नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी घेण्यात येईल.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य कापडी फलक घेऊन सभागृहाच्या वेलमध्ये येतात आणि घोषणा देतात.)

(यानंतर श्री.गायकवाड)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सदस्यांचा परिचय व शपथविधी

श्री.आर.आर.पाटील (उप मुख्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित या मतदार संघातर्फे निर्वाचित केलेल्या श्री.राणा जगजितसिंह पदम्सिंह पाटील यांचा आपणास व आपल्यामार्फत या सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येतात तसेच घोषणा देतात)

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, अशा गोंधळाच्या वातावरणामध्ये शपथ घेण्याची आमची इच्छा नाही. तेव्हा उद्या शपथ घेण्यात येईल. सभापती महोदय, गोंधळ कधी करावा याबाबतीत आपण विरोधी पक्षाच्या सदस्यांना समज द्यावी. विरोधी पक्षाच्या सदस्यांना शेतक-यांच्या बाबतीत जो पुळका आलेला आहे तो पुतना मावशीचा आहे. संपूर्ण देशभरातील शेतक-यांना कोणत्या पक्षाने ख-या अर्थाने मदतीचा हात पुढे केलेला आहे याची प्रथम त्यांनी माहिती घ्यावी.

सभापती : विरोधी पक्षाचे नेते आणि विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य यांना मी सांगू इच्छितो की, आपण प्रथम आपल्या जागेवर जाऊन बसावे. एका तरुण नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी घेण्याचे जाहीर केल्यानंतर गोंधळ झाला म्हणून शपथविधी घेण्याचे थांबविणे बरोबर होणार नाही.शपथविधी उद्या घेण्यात येईल असे माननीय उप मुख्यमंत्र्यांनी जरी म्हटलेले असले तरी आपण मनाचा मोठेपणा दाखवून शपथविधीचा कार्यक्रम पूर्ण करु या.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय,मेहरबानी करुन हा प्रतिष्ठेचा प्रश्न आपण करु नका.सन्माननीय सदस्यांबद्दल मला सद्भाव आहे,सन्मान आहे. परंतु आज सभागृहातील वातावरण चांगले नाही. कापसाचा प्रश्न महत्वाचा असून शेतक-यांनी केलेल्या आत्महत्यांचा प्रश्न जटील आहे.मी माननीय उप मुख्यमंत्र्यांना विनंती करतो की, हा शपथविधीचा कार्यक्रम एका चांगल्या वातावरणात नंतर घेण्यात यावा.आजच हा कार्यक्रम घेण्याचा अट्टाहास आपण करु नये.

सभापती : मी दोन्ही बाजूच्या सदस्यांना विनंती करतो.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आज शपथविधी घेण्यात येऊ नये. आम्ही आपल्याला 289 अन्वये नोटीस दिलेली आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आपण शपथविधीच्या निमित्ताने सन्माननीय सदस्यांना बोलण्याची पहिली संधी देत असतो.तेव्हा शपथविधीचा कार्यक्रम आज पूर्ण करु या.आपण सभागृहात अनेक विषयावर गांभीर्याने विचार करीत असतो.परंतु आज शपथविधी होऊ न देणे म्हणजे या तरुण सदस्यावर नकळतपणे आपण अन्याय केल्यासारखे होईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, त्यांच्यावर आपण अन्याय करीत नाही.उद्या चांगल्या वातावरणा शपथविधी घेण्यात यावा. आम्ही त्यांचे स्वागत करु.

श्री.दिलीप वळसे-पाटील :सभापती महोदय, ज्यावेळी माननीय विरोधी पक्ष नेते श्री.नितीन गडकरी यांनी नियम 289 अन्वये प्रस्ताव मांडला . कापसाचा प्रश्न आहे, शेतक-यांचा प्रश्न आहे तसेच सरकारची भूमिका समजावून घेण्याचा प्रश्न आहे. या सगळया महत्वाच्या बाबी असल्या तरी सुध्दा या सभागृहाचे कामकाज हे नियमाप्रमाणे आणि नियमाच्या पुस्तकाप्रमाणे चालते. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी किंवा विरोधी पक्षाच्या सदस्यांनी नियम 289 च्या प्रस्तावाबाबत आग्रह धरल्यानंतर त्यांनी लिमिटेड भूमिका मांडावयास पाहिजे होती. 289 अन्वये नियम सस्पेन्ड करण्यात यावा आणि सभागृहापुढील दिवसाचे कामकाज रदद करुन या विषयावर चर्चा सुरु करण्यात यावी. एवढेच मांडण्या ऐवजी विषयाच्या मेरीटमध्ये जाऊन सगळी भूमिका या ठिकाणी मांडण्यात आली होती.दोन्ही बाजूंकडून या ठिकाणी आरोप प्रत्यारोप करण्यात आले होते.माननीय उप मुख्यमंत्र्यांनी राज्य शासनाची न्याय्य भूमिका या संदर्भात माडली होता .त्यानंतर सभापती महोदय, आपण याबाबतीत रुलिंग दिले होते .नियम 289 खालचा प्रस्ताव आपण मान्य करीत नाही असे रुलिंग दिल्यानंतर सभागृहाचे पुढील कामकाज होणे अभिप्रेत आहे.

नंतर श्री.जागडे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील....

सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज हे नियमाने चालते. यासाठी लाखो-करोडो रुपये खर्च केले जातात. असे असताना सभागृहाचे कामकाज करावयाचे नाही, अशी भूमिका घेणे बरोबर होणार नाही. मला माननीय सभापतींना अशी विनंती करावयाची आहे की, आपण आज या ठिकाणी मा.सदस्यांचा शपथविधी घेऊ नका. परंतु सभागृहाचे पुढील कामकाज तरी घ्यावें.

(गोंधळ)

सभापती : मी आता कोणालाही बोलावयाला परवानगी देणार नाही. यापूर्वीच मी माननीय सदस्यांना बोलावयाला परवानगी दिली आहे.

(गोंधळ)

श्री. विनोद तावडे : कोणत्या नियमाने दिलीप वळसे-पाटील या ठिकाणी बोलले आहेत.

(गोंधळ)

सभापती : एकंदरीत जी परिस्थिती होती, त्याबाबत ते बोलले आहेत.

(गोंधळ)

Shri Dilip Valse-Patil : Hon. Chairman Sir, I was on Point of Procedure of the House.

(गोंधळ)

सभापती : या बाबतीत मी सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले आहे. आता मी सभागृहाचे कामकाज 15 मिनिटे थांबविणार आहे. माझे या बाबतीत एवढेच मत आहे की, सभागृहाचे कामकाज पुन्हा सुरु झाल्यानंतर मा. सदस्यांचा शपथविधी घेऊ व त्यानंतर शोकप्रस्ताव घेऊ. 15 मिनिटाच्या दरम्यान विरोधी पक्षांकडून तसेच सत्ताधारी पक्षाकडून काही विचार पुढे येऊ शकतात. तेव्हा मी आता सभागृहाचे कामकाज 15 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाचे बैठक 2 वाजून 02 मिनिटांनी, 15 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

--

(यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी मा. सभापती)

पृ.शी./मु.शी.: नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी

(सचिवांनी संबंधित सदस्यांचे नाव पुकारल्यानंतर)

श्री. राणा जगजितसिंह पद्मसिंह पाटील यांनी शपथ घेतली.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शोक प्रस्तावाबाबत

सभापती : आजच्या कामकाजपत्रिकेवर अनु.क्र.तीन समोर दाखविण्यात आलेले (अ) व (ब) हे दोन्ही शोक प्रस्ताव आज ऐवजी . . . .

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेले दोन्ही शोक प्रस्ताव उद्या घेण्यात यावेत.

सभापती : ठीक आहे. आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेले (अ) व (ब) हे दोन्ही शोक प्रस्ताव उद्या घेण्यात येतील.

(यानंतर विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात आणि कापडी फलक दाखवितात.)

पृ.शी./मु.शी.: अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

डॉ.सुनील देशमुख (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 213 (2) (अ) अन्वये सन 2005 चा अध्यादेश क्रमांक 1 - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

(घोषणा)

पृ.शी./मु.शी.: सन 2004-2005 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करणे.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2004-2005 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे, आणि तसे करीत असताना मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 आणि 203 (3) मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल सन 2004-2005 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस करीत आहेत.

सभापती : सन 2004-2005 मधील खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: आकस्मिकता निधीतून मंजर केलेल्या आगाऊ रकमांची सूची सभागृहासमोर ठेवणे.

डॉ.सुनील देशमुख (वित्त व नियोजन मंत्री) : सभापती महोदय, मंगळवार, दिनांक 15 मार्च 2005 रोजी विधानमंडळास सादर करण्यात आलेल्या खर्चाच्या पूरक विवरण पत्रात, ज्यांच्या बाबतीत पूरक मागण्या समाविष्ट करण्यात आल्या नव्हत्या अशा, आकस्मिकता निधीतून दिनांक 11 मार्च 2005 पर्यंत मंजूर केलेल्या आगाऊ रकमांची सूची मी सभागृहासमोर ठेवीत आहे.

सभापती : सूची सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(घोषणा)

सभापती : सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 16-3-2005 रोजी 16-3-2005 रोजी दुपारी 1.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी2 वाजून 23 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 16-3-2005 च्या दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही